# सूर्य

तू नव्हतास तरी ही, जगणे चांदणं होते
अंधार सोबती अन मनात पैंजण होते ||

तू नव्हतास तरी ही, जगणे मंजुळ वारा
हळुवार छेडितो स्पर्श तरंग बावरा ||

तू नव्हतास तरी ही, जगणे पहाट गाणी
प्रेम धुंद अन मन-मुग्ध रातराणी ||

तू नव्हतास तरी ही, जगणे शांत नभाचे
मुक्या कळ्या अन दवबिंदू अव्यक्ताचे ||

तू नव्हतास तरी ही, जगणे चंद्र-प्रकाश
शुभ्र शीतल मोहमयी बाहुपाश ||

तू आलास एकदा, जगणे सोन-प्रकाश
मनात पैंजण पण नाद भरे अवकाश ||

तू आलास एकदा, जगणे तुफान वारा
स्पर्श अनावर, देही उत्फुल निखारा ||

तू आलास एकदा, जगणे ऊन-चांदणी
उधळी पलाश अन अतृप्त सांज अंगणी ||

तू आलास एकदा, जगणे भ्रमर-फुलाचे
मोकळ्या पाकळ्या तरी आठव त्याच मिठीचे ||

तू आलास एकदा, जगणे धुक्यात हरवणे
अगम्य कुठेशा क्षितिजावरती, पुन्हा तुझेच असणे ||

**------------संध्या रानडे**